अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
कार्यालय, पाषाण रोड, चव्हाणनगर, पुणे - ४११ ००८.
दुरध्वनी क्र. (०२०)२५६३८४४७ फॅक्स (०२०) २५६३८४४३
ई मेल :- SP.cid.adm@mahapolice.gov.in वेबसाईट :- www.mahacid.gov.in

जा.क्र.अपोमसं/गुअवि/आस्था-३/स.शादप/ सार्व.बदल्या/२०२५/ ३०१६ पुणे, दि. /०५/२०२५
30 MAY 2025

# आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील प्रकरण २ मधील तरतुदीनुसार, आणि शासन अधिसुचना, गृह विभाग, क्र.टिआरएन-०३११ /१३३५/प्र.क्र.-२९१/पोल-५ब, दि.२९/०३/२०११ अन्वये दिलेल्या अधिकारानुसार तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.२६/१२, दिनांक ३१ जानेवारी २०१४ मधील (ब) नागरी सेवा मंडळ (२) चे शिफारशीनुसार राज्य गुन्हे अन्वेषण विभागातील हस्ताक्षर व छायाचित्रण विभागातील खालील नमुद केलेल्या सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षकांनी सध्याच्या नेमणूकीच्या एका ठिकाणी विहित पदावधीची सेवा पुर्ण केल्यामुळे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे प्रशासकिय कारणास्तव सार्वत्रिक बदल्या करण्यात येत आहे.

| सहाय्यक शासकिय दस्ताऐवज परिक्षक | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. योगेश पंचबाटकर | गुअवि, छ.संभाजीनगर | गु.अ.वि., मुंबई |
| २ | श्री. मयुर वासुदेव चांडोले | गुअवि, पुणे | गु.अ.वि., नागपूर |
| ३ | श्री. सुर्यकांत भानुदास कांबळे | गुअवि, पुणे | गु.अ.वि., मुंबई |
| ४ | श्री. नरहरी रघुनाथ पाटील | गुअवि, पुणे | ०१ वर्ष मुदतवाढ |
| ५ | श्रीमती शितल अजय आत्राम | गुअवि, पुणे | ०१ वर्ष मुदतवाढ |

२. बदली आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

- बदली बाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर पर्यायी हस्ताक्षर व छायाचित्रण विभागातील सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक यांची हजर होण्याची वाट न पाहता बदली सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक यांना तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे.
- बदली झालेल्या व कार्यमुक्त केलेल्या सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक यांना संबधीत प्रमुखांनी विना-विलंब रुजू करुन घ्यावे तसेच ते हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा. एखादा सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक रुजू करुन न घेतल्यास सक्तीचा प्रतीक्षाकाळ ठरवून काम न देता भत्ते देण्याचा प्रश्न उद्‌भवल्यास संबधित घटक प्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल.
- बदलीच्या आदेशात बदल करुन घेण्यासाठी कोणत्याही हस्ताक्षर व छायाचित्रण विभागातील सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षकांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे बाहय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे हस्ताक्षर व छायाचित्रण विभागातील सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक यांचेवर शिस्तभंग विषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.
- बदली झालेल्या हस्ताक्षर व छायाचित्रण विभागातील सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षकांनी त्यांची पदस्थापना केलेल्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे.

२/-

- बदली आदेशांनतर जे सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील, त्यांना रुग्ण निवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (stand relived) करण्यात यावे व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

सदरचे आदेश अपर पोलीस महासंचालक गु.अ.वि., म.राज्य., पुणे कार्यालयाच्या mahacid.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

( सुनिल रामानंद )
अपर पोलीस महासंचालक,
गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे.

प्रति,

१. मुख्य शासकिय दस्तऐवज, हस्ताक्षर व छायाचित्रण विभाग, गु.अ.वि, पुणे.
२. अति. शासकीस दस्तऐवज परिक्षक, हस्ताक्षर व छायाचित्रण विभाग, गुअवि मुंबई
३. शासकीय दस्ताऐवज परिक्षक, हस्ताक्षर व छायाचित्रण विभाग, गु.अ.वि, नागपूर

२/- - वर नमुद बदली करण्यात आलेल्या सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्रे बदली टिकाणी पाठविण्यात यावीत.

प्रत,

विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.गु.कें, गु.अ.वि., पुणे.
पोलीस अधीक्षक, तांत्रिक सेवा, गु.अ.वि., पुणे
लेखा शाखा/ गोपनिय शाखा/ बायोमॅट्रीक शाखा, गु.अ.वि., म.राज्य, पुणे.

२/- - वर नमुद बदली करण्यात आलेल्या सहायक शासकीय दस्तऐवज परिक्षक यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्रे बदली टिकाणी पाठविण्यात यावीत.

संगणक शाखा गु.अ.वि., म.राज्य, पुणे.

२/- सदरचे आदेश कार्यालयीन संकेतस्थळावर एक महिन्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत.